# जाहीर फेर निविदा
## चिपळूण नगर परिषदेकडून

चिपळूण नगर परिषदेस छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पूर्णाकृती पुतळा नगर परिषद सुचवेल त्या जागेमध्ये बसवून देणेचा आहे. तरी ज्यांना छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा तयार करणेचे ज्ञान आहे, यापूर्वी ज्यांना राष्ट्र पुरुष, थोर व्यक्ती व छत्रपती शिवाजी महाराजांचे अश्वारुढ पुतळे उभारणेचे कार्य केले आहे. अशा तज्ञ व्यक्तींनी / संस्थेने आपली निविदा चिपळूण नगर परिषदेकडे दिनांक २४/०९/२०१० रोजी पर्यंत प्रशासकीय अधिकारी यांच्या कार्यालयातील निविदा बॉक्समध्ये द्यावयाची आहे./सादर करावयाची आहे.

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | कामाची मुदत | निविदा फॉर्मची किंमत | बयाणा रक्कम डि.डि/मुदत ठेव पावतीने |
|---|---|---|---|---|
| १ | छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुर्णाकृती पुतळा, ब्राझ धातूमध्ये तयार करुन बसवून देणे, पुतळ्याची उंची १२ फुट असणे आवश्यक आहे. | ११ महिने | १,५००/- | २०,०००/- |

**अटी व शर्ती**

१. निविदा फॉर्म मिळण्याची शेवटची तारीख २१/०९/२०१० वेळ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत रेकॉर्ड विभागात मिळतील.
२. निविदा पूर्व बैठक तारीख २३/०९/२०१० वेळ सायंकाळी ४.३० वाजता मुख्याधिकारी चिपळूण नगर परिषद यांचे चेंबर मध्ये होईल.
३. निविदा सादर करण्याची अंतीम तारीख २४/०९/२०१० वेळ दुपारी २.०० वाजेपर्यंत प्रशासकिय अधिकारी, चिपळूण नगर परिषद यांचे कक्षामध्ये ठेवलेल्या टेंडर पेटीमध्ये टाकावयाची आहे.
४. पुतळ्याचे फौंडेशन शासकीय वास्तु विशारद, महाराष्ट्र राज्य यांनी मंजूर केलेली असणे आवश्यक आहे.
५. पुतळ्याचे क्ले मॉडेल, मेणाचे मॉडेल अथवा मा. संचालक, कला संचालनालयास सुचवतील त्या मटेरियलमधील मॉडेल मा. संचालक सो. कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांची मान्यता घेऊनच पुतळा पूर्णाकृतीचा तयार करुन व बसवून द्यावयाचा आहे. त्याची एकूण खर्चाची रक्कम लिहावयाची आहे.
६. निविदा उघडण्याची अंतीम तारीख २४/०९/२०१० वेळ सायंकाळी ४.३० वाजता चिपळूण नगर परिषद कार्यालयामध्ये उपस्थित ठेकेदार यांचे समक्ष उघडणेत येतील. उशीरा आलेल्या पोष्टाने/कुरीयरने आलेल्या निविदा स्विकारण्यात येणार नाहीत. कामासंबधी नकाशे अंदाजपत्रक व माहिती नगर परिषद बांधकाम विभागात पहावयास मिळेल. सविस्तर निविदा सुचना नगर परिषदेच्या अभिलेख व भांडार विभागात मागणी केल्यास विनामुल्य उपलब्ध आहेत. किंवा नगर परिषद नोटीस बोर्डवर पहावयास मिळेल. कोणतेही सर्व अथवा एक निविदा स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचे अंतिम अधिकार मुख्याधिकारी, चिपळूण नगर परिषद यांजकडे राखून ठेवणेत येत आहेत.

मुख्याधिकारी                    नगराध्यक्ष
चिपळूण नगर परिषद चिपळूण

सविस्तर निविदा सुचना नगर परिषदेच्या www.cmcchiplun.org या संकेतस्थळावर पहावयास मिळेल.

## सविस्तर निविदा सुचना

१. बयाणा रक्कम डी.डी. किंवा मुदत ठेव किमान १ वर्षे मुदतीची स्विकारली जाईल. रोखीने स्विकारली जाणार नाही.
२. निविदा फॉर्म एक खिडकीमध्ये आवश्यकती रक्कम रोख भरल्यानंतर न.पा.च्या अभिलेख व भांडार विभागातून उपलब्ध होतील.
३. यशस्वी ठेकेदार यांनी करारनाम्यासोबत अनामत रक्कम भरली नाही अथवा करारनामा विहीत मुदतीत केला नाही तर भरलेली बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल. करारनामा पूर्ण झाल्यावर यशस्वी ठेकेदारांची बयाणा रक्कम सुरक्षा अनामत म्हणून वर्ग होईल.
४. निविदा सादर करण्याची पध्दत
   - ४.१ निविदा दोन स्वतंत्र लखोट्यात सिलबंद सादर करणे आवश्यक आहे.
   - ४.२ निविदा लखोटा क्र.१ मध्ये बयाणा रक्कमेचे डी.डी/मुदत ठेव पावती, तांत्रिक व आर्थिक क्षमता सिध्द करणारे कागदपत्र आवश्यक आहेत. अश्वारुढ पुतळा उभारल्या बाबतचे कामाचे अनुभवाचे दाखले या कागदपत्रांची यादी व सर्व कागदपत्र सत्यप्रती लिपी (साक्षांकित) करणे आवश्यक आहे. निविदेसोबत कोणत्याही अटी शर्ती टाकावयाच्या असल्यास लखोटा क्र.१ मध्ये ठेवणे आवश्यक आहे.
   - ४.३ लखोटा क्र. २ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पूर्णाकृती पूतळा तयार करुन बसविणेकामाची एकूण खर्चाची ठोक रक्कम देणेची आहे.
   - ४.४ मंजूर झालेल्या निविदा धारकाचे बीलातून आवश्यकते शासकीय कर वसुल केले जातील.
   - ४.५ शासन निर्णय क्रमांक स्मारक-३१०२/८८४/प्र.क्र.१२२/२००२/२९ दिनांक २ फेब्रुवारी २००५ प्रमाणे पुतळ्याचे क्ले मॉडेल, मेणाचे मॉडेल, मा. संचालक सोा कला संचालनालय सुचवतील त्या मटेरियलमधील मॉडेल मा. संचालक, सोा, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांची मान्यता घेवूनच छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पूर्णाकृती पूतळा तयार करुन बसवून द्यावयाचा आहे.
   - ४.६ वरील परिपत्रकातील आवश्यकत्या मंजूरी घेवूनच काम करावयाचे असल्याने त्याप्रमाणे दर नमुद करावेत. त्यानंतर अतिरिक्त बील स्विकारण्यात येणार नाही.
   - ४.७ छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पूर्णाकृती पूतळा खालील चौथरा या कार्यालयास संबधीत विभागाची मंजूरी घेवून त्यानंतर काम करावयाचे असल्याने याबाबत आवश्यकती पूर्तता झाल्यानंतर चौथऱ्याचे काम पूर्ण झाल्यावरच सदर पूतळा बसविणेचा आहे.
   - ४.८ याकामाबाबत कोणत्याही परिस्थितीत भाववाढ देण्यात येणार नाही.
५. निविदा उघडणे.
   - ५.१ निविदा उघडणेसाठी नेमलेल्या दिवशी प्रथम लखोटा क्रमांक १ उपस्थित ठेकेदारासमोर उघडणेत येईल. व त्यामध्ये कागदपत्रांची छाननी मुख्याधिकारी किंवा मुख्याधिकारी यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी करतील. व उपस्थित ठेकेदार यांचे आक्षेप यासंबधी खात्री करतील.
   - ५.२ दुसरे दराचा सिलबंद लखाटा लखोटा क्र.१ मधील कागदपत्रे योग्य असल्याबद्दल मुख्याधिकारी अथवा मुख्याधिकारी यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांची खात्री पटल्यानंतरच उघडण्यात येईल.
   - ५.३ निविदा लखोटा क्र. १ मधील कागदपत्रे अपूर्ण अथवा अयोग्य असल्यास लखोटा क्र. २ उघडण्यात येणार नाही. व तो निविदा धारकांला परत मिळणार नाही.
   - ५.४ निविदा धारकांने निविदेच्या संपूर्ण अटी व शर्ती वाचल्या असल्याबद्दल व त्या मान्य असल्याबद्दल प्रत्येक पानावर सही करणे आवश्यक आहे. तसेच कामाचे नकाशे अंदाजपत्रक पाहिले असलेबद्दल निविदेतील प्रतिज्ञापत्रावर सही करणे आवश्यक आहे.
   - ५.५ कामाचे बाबतीत किंवा कागदपत्राचे बाबतीत कोणताही बदल आवश्यक असल्यास त्याबाबत निविदा फॉर्म खरेदी करणारे ठेकेदार यांना पत्राने तसेच वर्तमान पत्रात त्याबाबत आवश्यक ती शुध्दीपत्रक निविदा सादर करण्याच्या दिवसापूर्वी प्रसिध्द करणेत येईल.
   - ५.६ निविदेसंबधी कोणतेही मुद्दे उपस्थित करावयाचे असल्यास ते निविदेसोबत लखोटा क्र. १ मध्ये देणे आवश्यक आहे. मुख्याधिकारी यांचेवर कोणत्याही अटीची निविदा किंवा बेकायदेशिर अटी स्विकृत करण्याचे बंधन नाही.

६. यशस्वी निविदा धारकांना निविदा मंजूरीनंतर योग्य रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करून देणे आवश्यक आहे.

७. मंजूर निविदा धारकांना निविदा मंजूरीबाबत कळविल्यापासून १० दिवसांचे आंत करारनामा व करारनाम्यासोबत भरावयाची सुरक्षा अनामत रोखीने अथवा मुदत ठेवीने न भरल्यास निविदा अमान्य करून फेर निविदा अथवा अन्य निविदाधारकांची निविदा स्विकृत करावी लागल्यास फरकाची रक्कम संबधीत ठेकेदाराकडून महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १५१ अन्वये वसुल पात्र असेल.

८. कोणतेही अथवा सर्व निविदा स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे. त्याबाबत कोणतेही कारणे देण्यात येणार नाहीत.

मुख्याधिकारी
चिपळूण नगर परिषद